म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. ८०८६
२७१९८८

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणें.

--लवाग--

# कॉलेजांतील गाणीं !-

"We want the *poetry of life.*"
—*Shelley.*

काव्य ८०८६

संपादकः—

वि. ना. पांगारकर, बी. ए.

REFBK-0003702
REFBK-0903702

किंमत ६ आणे.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

--फुलबाग--

# कॉलेजांतील गाणीं !–

"We want the *poetry of life.*"

—*Shelley.*

संपादकः—

**वि. ना. पांगारकर,** बी. ए.

लेखकः—

**"घंटाळीची मोहन…**

प्रस्तावना लेखकः—

प्रो. **कृ. म. खाडये,** बी. ए. (Cantab.) एम्. ए.

फर्ग्युसन कॉलेज, **पुणें.**

इ. स. १९२८

**किंमत ६ आणे**

नों. नं.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3609
REFBK-0003702

क्रमांक: ८७५ ता. १३।८।२

# " आभार-प्रदर्शन "

"I have here made only a nosegay of culled flowers, and have brought nothing of my own but the string that ties them."

—*Montaigne.*

हें कदाचित् माझ्या बाबतींत शब्दश: साजणार नाहीं. कारण ह्या पुस्तकांत माझे स्वत:चेही कांहीं लेख* आहेत. परंतु एकंदरींत विचार करतां ज्या एका विशिष्ट धाग्यानें हीं सर्व फुलें एकत्र गुंफलीं गेलीं आहेत त्याकडेच माझा विशेष संबंध आहे. आणि म्हणूनच वरील उताऱ्यांतील सत्यता माझ्या बाबतींतही बऱ्याच अंशीं पटण्यासारखी आहे. प्रसिद्धीकरितां ज्या ज्या व्यक्तींनीं लेख पाठविले त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें प्रो. खाडयांनीं आपला अमोल वेळ खर्चून प्रस्तावनेच्या द्वारें ह्या नवीनच अशा प्रयत्नाला जो पाठिंबा दिला, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तसेंच श्री लक्ष्मी-नारायण प्रेसचे मालक रा. रा. अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छपाईचें काम सुबक व मनोहर करून देऊन वेळीं जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

माधवाश्रम
मुंबई.
२०-६-२८.

आपला नम्र.
**वि. ना. पांगारकर.**

---

* " प्रेम कीं शिक्षण," " मधुमालतीचीं फुलं," " मित्रांच्या मैत्रिणी,' " वेच गडे ग वेच," "निवड होउं दे," वगैरे.

# अनुक्रमणिका.


उपोद्‌घात ... ... ... ... ... १

" वेंच गडे ग वेंच ! " ... ... ... ... ३

" प्रेम कीं शिक्षण ? " ... ... ... ... ४

" रमूं ये प्रेम संसारीं ! "... ... ... ... ७

*" मुख शशांक तिचा बघतां तदा ! " ... ... ८

" मधुमालतीचीं फुलं ! "... ... ... ... ९

" १२ फेब्रुवारी १९२५ " ... ... ... ... १२

" मित्रांच्या मैत्रिणी ! " ... ... ... ... १३

" वंचना." ... ... ... ... ... १६

" हुंगलेलें फूल !" ... ... ... ... १७

" फोल आयुष्य ! " ... ... ... ... २०

" ऐकूं दे तव गान-निर्झरा ! " ... ... ... २२

' समाजाचें हृदयाविष्करण ! " ... ... ... २४

" सहाध्यायाला उद्देशून ! " ... ... ... २६

" निवड होउं दे ! " ... ... ... ... २९

" कॉलेजांतील गाणीं !" ... ... ... ... ३०


---

* ह्या कवितेंत तिसऱ्या ओळींत " जइं जसे " च्या ऐवजीं " ज असें—" वाचावें.

# प्रस्तावनेदाखल चार शब्द.

महाराष्ट्रांतील तरुण मंडळीच्या भावनांचें व विचारांचें प्रतिबिंब प्रस्तुत पुस्तकांत थोडयाबहुत प्रमाणांत तरी दिसेल असें वाटल्यावरूनच, मला मराठी लिहिण्याचा हल्लीं फारसा सराव नसतांहि, श्री. पांगारकरांच्या आग्रहाला मी बळी पडलों, व या पुस्तकाला प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिण्याचें पत्करिलें.

परंपरा ( Tradition ) आणि बंड (revolt or reaction) या गोष्टी वाङ्मयाच्या इतिहासांत जागोजाग दृष्टीस पडतात. कोणत्याहि राष्ट्राकडे पाहिलें तर साधारणपणें असें दिसून येईल कीं, प्रौढ लोक परंपरेस, तर तरुण लोक बंडास अग्रपूजेचा मान देतात. आपल्याकडे मात्र रूढी इतकी बळकट झालेली आहे कीं, नवीन विचारांचें प्रदर्शन करण्याचें धाडस नवीन कवींकडूनहि फारच क्वचित्प्रसंगीं होतें. काव्याची भाषा ठरलेली, काव्याचे विचार ठरलेले, व काव्यांत दिसून येणाऱ्या भावनाहि ठरलेल्याच ! तरुण मंडळीच्या मनांत खरोखर स्फुरत असलेल्या भावना त्यांनीं पुढें मांडल्या तर तो पाणचटपणा होतो, व त्यांचे विचार जसेच्या तसे बाहेर पडलें तर पोरकटपणा हें नांव आम्हीं त्यांना देतों. अशा या परिस्थितीमुळें, श्री. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें, स्वातंत्र्याला वावच मिळेनासा झाला आहे. अशा स्थितींत बंडखोर प्रवृत्तीस—मग त्यामुळें पाणचटपणा (?) आणि पोरकटपणा (?) थोडासा वाढला तरी चालेल—प्रोत्साहन दिल्याशिवाय काव्याचा झरा जिवंत राहील कीं नाहीं याबद्दलच मन साशंक होतें. पाणचटपणा आणि पोरकटपणा यामधूनच पुढें प्रगल्भ विचार आणि उदात्त भावना यांचा उगम झाला पाहिजे अशी माझी खात्री आहे, म्हणून कॉलेज मॅगेझिन्समधून तरी तरुण मंडळींना आपल्या डोक्यांत स्वतंत्रपणानें येत असलेले विचार व मनांत उद्दीपित होणाऱ्या भावना मांडतां याव्यात असें मला वाटतें. श्री. पांगारकरांनीं संकलित केलेल्या ‘ कॉलेजांतील गाण्यां’चा असा कांहीं तरी उपयोग होईल अशी मला बळकट आशा आहे.

खरा कारागीर म्हणजे आपल्यामध्यें जें आहे–आपल्याला ज्याची प्रत्यक्ष अनुभूति झालेली आहे–तें जोरानें, सहज पटेल अशा स्वरूपांत, आणि जशाचें तसें मांडण्याची ज्याला हतोटी साधली आहे तो. मृत किंवा मृतप्राय गोष्टीं-पासून आपली सुटका करून, रूढीचीं बंधनें तटातट तोडून, पूर्ण स्वातंत्र्याच्या वातावरणांत आपणाला काम करतां यावें अशीच त्याची मनीषा असते. पण रूढीचा जुलूम इतका भयंकर आहे कीं, बऱ्याचशा मंडळींना ही इच्छा जागच्या जागींच दाबून ठेवावी लागते. आपणांला लोक काय म्हणतील, याच भावना कां नेहमीं आमच्या मनांत येतात हा प्रश्न लोक विचारतील, तरुण पिढी अशी शृंगारलोलुप व नादान झाली आहे असा शेरा प्रौढ लोक आपल्यावर मार-तील, या भीतीनें घाबरून जाऊन आपल्या खऱ्या भावना व आपले खरे विचार लपवून ठेवण्याचा व तरुणपणींच वृद्ध आजोबाची बतावणी करण्याचा तरुण मंडळी जो खटाटोप कधीं कधीं करीत असतात तो खरोखरच हास्या-स्पद होय. प्रस्तुत पुस्तकामुळें ही दिशा बदलण्यास थोडीबहुत तरी मदत होईल अशी अटकळ करण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

तरुण मंडळीची स्वाभाविक कविता म्हणजे प्रेमगीतांच्याच स्वरूपाची असावयाची. पण प्रेमगीतें म्हणजे पाणचटपणा अशी समजूत आमच्या समाजामध्यें वावरत असल्यामुळें आमच्या काव्याची बरीच हानि झालेली आहे. इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनामुळें कोठें ही स्थिति थोडीशी सुधारत आहे; पण इतर राष्ट्रांच्या मानानें आमची प्रेम कविता फारच कमी व कमी दर्जाची आहे. ही स्थिती सुधारून या पुढें आपल्याकडे या प्रकारची कविता बरीच निर्माण होईल, व तिचा दर्जाहि वाढेल असा संभव दिसत आहे, व याबद्दल आपल्याला आनंदच वाटला पाहिजे.

प्रेम हा विषय जसा तरुण मंडळींच्या आवडीचा त्याप्रमाणेंच स्वदेशप्रीति आणि निसर्गनिरीक्षण या विषयांकडेही त्यांचें लक्ष बरेंचसें असतें ही गोष्ट त्यांना भूषणावह आहे यांत शंका नाहीं.

काव्य म्हणजे मनाला चटका लाविला आहे ज्यांनीं अशा भावनांचें प्रतिबिंब. हें जर खरें असेल तर या पुस्तकांत असलेल्या तऱ्हेचीं गीतें किंवा गद्यस्फुटें यांना उत्तेजन देऊन तरुण मंडळींना आपल्या हृदयाचें आविष्करण करूं देणें हें प्रत्येक समाजसुधारणावाद्याचेंहि आद्यकर्तव्य आहे असें मी समजतों. वस्तुस्थिति काय आहे हें पाहून मग सुधारणा पाहिजे कीं काय, व पाहिजे असल्यास कोणत्या दिशेनें ती केली पाहिजे—याचा विचार समंजस माणसांनीं करावयाचा, हें सोडून आपल्या उराशीं बाळगून ठेवलेल्या कल्पना तेवढ्याच मात्र बरोबर, बाकी सब झूट असें मानून जे लोक समाज सुधारावयास जातात त्यांना कधींहि यश मिळणार नाहीं, समाजामध्यें ढोंग मात्र जास्त पसरेल यांत तिळमात्र संदेह नाहीं. याहि कारणामुळें या पुस्तकांत प्रगट झालेल्या भावना व विचार यांच्याकडे लोकांचें लक्ष जावें असें मला वाटतें.

पुस्तकाच्या गुणदोषांची छाननी करण्याचा हा प्रसंग नव्हे. एकंदरींत पुस्तकाचें स्वरूप प्रगतिपर आणि धोरण इष्ट आहे. म्हणूनच श्री. पांगारकर यांनीं अंगिकारलेल्या या कार्यांत त्यांना यश येवो अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझी ही छोटीशी प्रस्तावना येथेंच पुरी करतों.

पुणें.
९ जून १९२८ } कृ. म. खाडक्ये

ग्रंथ संग्रहालय
नं. ........
........
. णे.

---

टर्म सुरू झाली !--आतां अभ्यास करा ! !—

**पण दिवाळीच्या सुटींत मात्र**

**"कॉलेजांतील गोष्टी !—"**

**वाचण्यास विसरूं नका हो ! ! !—**

# उपोद्घात

सायंकाळच्या प्रहरीं सहज आपलं लायब्ररींत जावं. थोडा वेळ इकडे तिकडे पांचदहा मासिकें चाळावीं—चार चित्रं पाहावीं कीं झालं! आला कंटाळा!—

कां?—असं कां व्हावं? दिवसभर परिश्रम करून थकून भागून आल्यावर घटकाभर मनरंजन करण्यासाठीं आपण लायब्ररींत जातों; पण तेथें गेल्यावर मन रमायचं एकाच बाजूला राहातं आणि नसता कंटाळा मात्र येतो. कशांत कांहीं नाहींसं वाटतं!–उदासीनता येते व कधीं एकदां घरीं परत जाईनासं होतं!–याचं कारण काय?

सुशिक्षित तरुण व्यक्तींना ज्यांत 'आपलेपणा' वाटेल, असं तिथं विशेष कांहीं नसतं. कारण हें वाङ्मय ज्या व्यक्तींकडून लिहिलं जातं त्यांत सुशिक्षित तरुणांचा जितका भरणा असावयास पाहिजे तितका असत नाहीं. किंबहुना मुळींच नसतो म्हटलं तरी चालेल!

याचीं कारणं शोधायला फारसा वेळ लागेल असं नाहीं. कित्येक तरुण व्यक्ति अशा असतात कीं, त्यांना आधीं लिहिण्याचाच कंटाळा!–प्रयत्न करायचाच नाहीं मुळीं! युनिव्हर्सिटीनं लावलेलीं टेक्स्ट बुकं हेंच त्यांचं सर्वस्व! त्यापलीकडे जग काय आहे याची त्यांना कल्पनाही नसते. बरं–दुसरे कित्येक तरुण असे आहेत कीं, त्यांच्या 'वाङ्मया'बद्दल कांहीं विलक्षणच कल्पना होऊन बसल्या आहेत.—"छे बुवा, आपल्याला कसलं लिहितां येणार? तें आपलं त्या बडया बडया लेखकांनींच करावं—" असं म्हणतांना ते नेहमीं आढळतात. 'नोटस्' वरून अभ्यास करण्याचा सराव जोरानं फैलावत चालल्यामुळें आमच्या तरुण पिढींतील स्वतंत्र विचार करण्याची शक्ति अजिबात नाहींशी होत चालली आहे. स्वातंत्र्य हा वाङ्मयाचा आत्मा आहे. तेव्हां अशा पामर परभृतांकडून वाङ्मयाचं काम कसं व्हावं? तशांतून कांहीं तरुण लिहिण्याचं धाडस करतात; पण त्यांच्या नव्या प्रयत्नांना प्रौढ संपादकांकडून मिळावं तसं प्रोत्साहन मिळत नाहीं.

ह्यामुळं सध्यांच्या लेखकवर्गांत सुशिक्षित तरुण व्यक्तींचा अंतर्भाव फारच कमी किंबहुना अगदींच नसल्यामुळं त्यांचा आनंद आणि त्यांचीं दुःखं, त्यांच्या चेष्टा आणि त्यांच्या लहरी, त्यांच्या अडचणी आणि त्यांचीं सुखं—यांचं परिवर्तन वाङ्मयांत जसं आणि जितकं व्हावयास पाहिजे तितकं आजकालच्या वाङ्मयांत झालेलं दिसत नाहीं. आणि म्हणूनच सुशिक्षित तरुण व्यक्तींना आजकालच्या वाङ्मयांत 'आपलेपणा' भासत नाहीं.

कॉलेज मॅगेझीन्स्‌मध्यें नेहमींच स्वतंत्र, शुद्ध आणि साध्या वाङ्मयाला वाव मिळतो असं नाहीं. वरील उणीव भरून काढण्याकरितां "कॉलेजांतील गाणीं" हा पहिलाच प्रयत्न आहे. त्याचं साफल्य थोड्याच दिवसांत दिसून येईल अशी आशा आहे.

पुणें
२०–१–१९२८

**वि. ना. पांगारकर.**
—संपादक

# वेंच गडे ग वेंच--!

( चालः—आनंदी आनंद गडे— )

फुलें फुलत हीं चोहिंकडे,
वेंच गडे ग वेंच गडे !—
    प्रफुल्ल उपवन भवतालीं,
    पाहुनि मनिं बाला रमली,
कुसुमित लतिका संदरशा
सुगंध उधळित दाहि दिशां !
  फुले बालिका,—
    खुले चंद्रिका !—
      फुलल्या कलिका—
प्रफुल्लता जिकडे तिकडे,
अटप तोंवरी वेंच गडे !–॥ १ ॥

कवि–"सुरेश" बी. ए.
सेंट झेव्हिअर कॉलेज मुंबई.

# “ प्रेम कीं शिक्षण ?--”

प्रेम कीं शिक्षण ?–किती नाजुक प्रश्न हा !–पण दिसायला जितका नाजुक आहे तितकाच तो सुटायला कठीण आहे ! कॉलेजांत शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक तरुण कुमारिकेला भयंकर त्रास देणारा जर एखादा प्रश्न असेल तर तो हाच !–प्रेम कीं शिक्षण !–

ज्या दिवशीं मी कॉलेजांत प्रथम पाऊल टाकलं तेव्हांच अगदीं दृढ निश्चय केला कीं, प्रेमाच्या भानगडींत म्हणून पुन्हां अगदीं मुळींच पडायचं नाहीं !–पण....पण काय उपयोग ?......कांहीं दिवसांनीं संध्याकाळच्या प्रहरीं सहज फिरायला म्हणून गेलें.....झालं !–घरीं परत आलें नाहीं तोंच...अस्पष्ट मूर्तींचीं कित्येक कल्पनाचित्रें डोक्यांत घोळूं लागलीं !–भावि सुखाच्या आनंदलहरींत क्षणभर अगदीं दंग झालें !–पण थोडक्यांतच मनाला अस्वस्थता आली आणि शेवटीं तर, नको हा एकदाचा त्रास असं होऊन गेलं ! पुन्हां अगदीं दृढ-दृढ निश्चय केला–आतां ह्या प्रेमाचं म्हणून नांव देखील काढायचं नाहीं अगदीं !—पण....सायंकाळच्या प्रहरीं सहज आपलं फिरायला म्हणून जावं,—एखादं तरुण जोडपं टूमदार “टूसीटर” मधून मोकळी हवा खाण्यासाठीं मोकळ्या मनानं मिरवीत चाललेलं पाहिलं कीं, मनांत वाटतं......एखाद्या बागेंत सायंकाळच्या रमणीय वेळीं हातांत हात घालून प्रेमानं कुजबुजत असलेली एखाद्या रंगेल युवयुवतीची जोडी दिसतांच—आपल्याला नाहीं का बरं हें सुख लाभणार ?—अशी उत्कंठा मनांत उत्पन्न होते व मग काय ?—कर कर केलेला दृढनिश्चय एकदम विरून जाऊन पुन्हा मन आपलं अगदीं गोंधळून जातं !—

बरं !–इकडे दुसऱ्या दृष्टीनं विचार केला तर,—पंचवीस सहवीस वर्षांच्या एखाद्या पदवीधर प्रौढ कुमारिकेला “सुशिक्षित” थाटमाट

करून रस्त्यानं मोठ्या ऐटीनं जातांना पाहिलं कीं वाटतं—छेः ! काय हा संसार ! त्यापेक्षां ही स्वतंत्रता बरी ! कुणाचं 'हूं' नको न 'टूं' नको, एखाद्या कुमारिका डॉक्टरणीचा नुकताच इंग्लंडहून आलेला नवा फोटो पाहिला, एखादी कुमारिका बॅरिस्टर वगैरे होऊन आलेली ऐकली, एखादी कुमारिका शिक्षणासाठीं सरकारी स्कॉलरशिपा वगैरे मिळवून परदेशीं गमन करतांना वाचली कीं वाटतं,–काय ह्या संसारांत आहे ? कसलं प्रेम–प्रेमवेड घेऊन बसलां आहांत ?–आपणही अशाच प्रका सोज्ज्वल कौमार्याची विजयी पताका कायमची फडफडत ठेवून स्त्री-जातीचा दिग्विजय साऱ्या जगभर गाजवीत सुटावं...असं वाटतं. तात्पुरती हुशारी येते, भयंकर आवेश येतो; व त्या झटक्यांत प्रत्यक्ष प्रयत्नालाही तात्पुरती सुरवात होते !–पण...पुढं काय ?...तें सर्व तात्पुरतंच !—

अशा प्रकारं बटकेंत हें तर घटकेंत तें ! एकदाचा निकाल असा कांहींच लागत नाहीं !–बरं !–दोन्ही धोंड्यावर पाय ठेवावा, तर एकही धड होत नाहीं. मग प्रेम हवं म्हणावं तर शिक्षणावर पाणी पडतं !–व शिक्षण हवं म्हणावं तर प्रेमाच्या नवसौख्याला सपशेल आंच-वावं लागतं ! काय करावं ?–कुणाचा स्वीकार करावा ? प्रे–म कीं शि-क्ष-ण ? विचार करून करून डोकं अगदीं पिकून जातं !—आणि शेवटीं ठाम निर्धार असा कांहींच होत नाहीं !—

लेः—* *

आजकालच्या समाजस्थितीचें

हुबेहूब चित्र—

दाखविणारें

व

मराठी वाङ्मयांत

विलक्षण खळबळ

उडवून सोडणारें

अगदीं नवीन

असें

पुस्तक

# कुमारिकांचें बंड

लवकरच

प्रसिद्ध

होईल.

लेखकः—वि. ना. पांगारकर बी. ए.

# रमूं ये प्रेम-संसारीं !

[ गझल ]

करीं निर्धार शेवटचा—विचारी वृत्ति तव भासीं,
कितीदां सांगणें तुजला—रमूं ये प्रेम-संसारीं ॥ धृ० ॥
मुशाफिर या जगाचा मी—क्रमाया जीवपथ आलों,
मिळेना साथिदार मला—म्हणूनी घाबरा झालों !
बघोनी मार्ग अवघड हा—गडे ! मम चित्त गडबडतें !—
परी तव मूर्ति आठवतां—मनाला शांतता येते !
निरुत्साहामुळें जग हें—घनांधक्कारमय वाटे,
तुझ्या चैतन्यज्योतीनें—तया तेजस्विता येते !
चढाया सौख्यसोपानीं—तुझ्यावरि भिस्त मम सारी,
तरी ही याचना तुजला—रमूं ये प्रेम-संसारीं !

*    *    *    *

अशा नाजूकशा गोष्टी—हशावारी कशा नेसी ?—
नसे हा प्रश्न थट्टेचा—पडे ही गांठ प्राणाशीं !—
पुरे सरफांस प्रेमाचा—गळ्याशीं येउनी भिडला,
सुखाचा शब्द ऐकाया—अहा !—हा जीव तान्हेला !
कुठें नुकताच आतांसा—जरा ये डाव रंगांत,
नको आनंद तो मानूं—तिथें बेरंग करण्यांत !
रिघाया पैल तीराला—जिवाला ओढणी लागे,
न साहे धीर घटकेचा—उद्यांचा वायदा नलगे !
सदा हृन्मंदिरीं माझ्या—तुझी मूर्ती मनोहारी,
कशाला पाहसी अंत ?—रमूं ये प्रेम-संसारीं !

कवि:—"त्र्यंबकानुज"

न्यू पूना कॉलेज, पुणें.

कान्य नं. ८०८
ता. १३।८।२८
दा. क्र. 3602

# मुखशशांक तिचा बघतां तदा--!

"I look in her face-"

*Thomas Hardy*

मुखशशांक तिचा बघतां तदा
म्हणतसे–'मधु गीतचि गा सदा
जइं जसे प्रणयीं सुख साजिरें'—
परि न 'हो' नच 'ना' म्हणते बरें !—
'प्रणयि दुःख सदा वद हें तरी,
जरि प्रिये, तुज वाटतसे तरी'
वदत मी तिज यापरि तत्त्वतां
परि प्रिया मम सोडि न मुग्धता !-
परि यदा विषयांतर मी करी
मधुर गान तदा श्रवणीं भरी
जरि न शक्ति मला श्रवण्यास तें
खचित मद् हृदयीं तरि राहतें !—

* * * *

कविः—"ग. त्र्यं. देशपांडे"

मॉरिस कॉलेज, नागपूर.

दा. क्र. ३००२

# मधुमालतीचीं फुलं !-

मधुमालतीच्या फुलांची नुसती आठवण झाली कीं, कमळचं चरित्र माझ्या डोळ्यासमोर अगदीं हुबेहूब उभं राहातं !-आणि तिचे ते शेवटचे शब्द........!-मी जन्मभर तरी विसरेन का ?-कमळ—

लहानपणापासूनच काय असेल तें असो तिला आपलीं मधुमालतीचींच फुलं आवडायचीं !-फुलं फुलूं लागलीं कीं तिचा आपला नेमच ठरलेला. एक दिवस कांहीं चुकायचा नाहीं फुलांवाचून. तीन फुलांचा एक सुंदर टवटवीत झुपका—आणि एखाद् दुसरं कोंवळं पान असायचं त्याबरोबर-कधीं डाव्या खांद्यावर तर कधीं उजव्या दंडावर, कधीं पदराला तर कधीं अंबाड्यावरच आपला खोंवलेला असायचा !

कॉलेजांत असतांना तर तिच्या त्या पांढऱ्या शुभ्र पातळावर तीं रंगीबेरंगीं फुलं व तें कोंवळं नाजुक पान—इतकीं कांहीं उठावदार दिसायचीं !-मला तर अगदीं कौतुक वाटायचं त्यांना पाहून.

तीनच फुलं !-आणि तीं देखील कशीं ?-एक नुकतंच उमललेलं पांढरं शुभ्र !-कुठं चुकून एखाद् दुसरा रक्तिमा असेल त्यावर—; दुसरं गुलाबी व तांबूस यांच्या मधल्या रंगाचं, आणि तिसरं तर, अगदीं तांबडं भडक !—

अशीं हीं मधुमालतीचींच फुलं तुला इतकीं कां आवडतात-म्हणून मी कमळला कितीकदां तरी विचारलं असेल. पण त्यावर थोडंसं हंसल्यासारखं करून तिनं म्हणावं, "सांगेन रे बापू, एक दिवस तुला सर्व सांगेन—!"

कमळ निश्चयी तर खरीच. बी. ए. मध्यें तिचा पहिल्या वर्गांत दुसरा नंबर आला. परीक्षा झाल्या दिवसापासून ती अंथरुणाला खिळलेलीच होती. तोंड मात्र खणखणीत होतं. आवाज जरा उतरलेला येत असे—

रिझल्ट लागल्यानंतर तिसऱ्या दिवशींचीच गोष्ट !-दिवे लागायची वेळ. एकाएकीं कमळनं मला हांक मारली. पुढं काय होणार होतं तें

तिला माहितच होतं कीं काय कोण जाणे ! मी जवळ गेल्यावर...... तिचे ते शेवटचे शब्द......नुसती आठवण झाली कीं अंगावर कांटा उभा राहातो !—मला काय म्हणते—" आलास का ?—ये, बापू,—असा माझ्याजवळ ये...बैस असा इथं-बापू,-एकलंस-का ?-सांगेन सांगेन... म्हणून म्हटलं होतं ना तुला ?...मधुमालतीचीं फुलं मला कां आवडतात तें...? ऐक आतां..., बापू—, तुला आज मी सर्व सांगून टाकतें-" असं म्हणून तिनें हळू हळू एक एक शब्द बोलायला सुरवात केली.

आवाज किती शांत !-आणि बोलणं किती गंभीर ! खरोखर !- त्या वेळचं तें चित्र कसं अगदीं हुबेहूब माझ्या डोळ्यासमोर उभं राहातं !- आणि तिचे ते शेवटचे शब्द....!-अजून माझ्या कानांत गुणगुणत आहेत. वाटतं कालच घडला आहे हा सर्व प्रकार ! - पण—

कमळ म्हणाली, "बापू, पुरुषांच्या आत्म्याचं समाधान महत्वाकांक्षेनं आणि स्त्रियांच्या आत्म्याचं समाधान प्रेमानं होतं !...मला प्रेम नको होतं का ?...विवाहसुखाला अजिबात आंचवावं अशी का माझी इच्छा होती ?...संसारसुखाचा लाभ होऊं नये असं का मला वाटत होतं ?... छेः!-बापू,-छेः! !—आज मी आपलं हृदय तुला अगदीं मोकळं करून सांगतें...नाहीं बरं...नाहीं ! अशी कल्पना माझ्या एक दिवस देखील डोक्यांत आली नाहीं. पण...माझ्यापुढं एक विशिष्ट ध्येय होतं ना ?- मी बी. ए. झालें...ती लोकांच्याकडून पोकळ मोठेपणा मिळविण्या-साठीं नाहीं !...बापू..., माझं ध्येय काय होतं-मी कॉलेजांत शिकलें ती ' लेडी-स्टयूडंट ' म्हणून वृथा मिरविण्यासाठीं नाहीं !...बापू..., माझं ध्येय काय होतं...तुला माहित आहे का ?...मला पुरुषांची खात्री करून द्यायची होती...पुरुषांप्रमाणं...प्रयत्न केल्यास...स्त्रियांनाही आपल्या बुद्धीचा विकास करून दाखवितां येईल...आम्हींच तेवढे हुशार...असा पुरुषांचा डौल...आजपर्यंत स्त्रियांच्यापुढं चालत असे... आतां यापुढें...पुरुषांना असं म्हणतां येणार नाहीं !...स्त्रियांना...प्रत्येक बाबतींत पुरुषांची बरोबरी करून दाखवितां येईल...हें...हें...प्रत्यक्ष उदाहरण दाखवून...सिद्ध करून देणं...हेंच माझं ध्येय !...तें...मी

आज तडीस नेऊन दाखविलं आहे...पण...पण...बापू, असं करीत असतां...माझी ही स्थिति झाली..........................बापू... मी...वैवाहिक सुखाला...अंतरलें !...बापू—मी...प्रेमाला पारखी झालें !...माझ्या आत्म्याचं...समाधान कसं व्हावं ?—

...मधुमालतीचीं फुलं !...मधुमालतीचीं फुलं...हीं...प्रेमानुरक्त स्त्री हृदयाचीं...उज्ज्वल प्रतिबिंबंच आहेत !–फूल फुललं...कीं पांढरं शुभ्र असून...कुठं एखाद् दुसरी... गुलाबी छटा असते त्यावर...हें कुमा-रिकेच्या हृदयाचं...साक्षात् प्रतिबिंब !...नंतर...कांहीं काळ गेल्या-नंतर...तेंच मधुमालतीचं फूल...गुलाबी...गुलाबी...होऊं लागतं... ही...विवाहित तरुणीच्या हृदयाची...प्रत्यक्ष प्रतिमा !...आणि नंतर...कांहीं काळानं तेंच फूल...संसार-रत प्रौढ स्त्रीच्या हृदयाचं द्योतक...अर्थात्...तांबडं भडक दिसतं !...मी कुमारिका !...स्त्री... विवाहित तरुणी...आणि संसार-रत प्रौढ स्त्री...यांच्या सुखाचा अनुभव...मला कोठून मिळणार ?...हीं सुखं...बापू..., मला लाधलीं नाहींत !...म्हणूनच...म्हणूनच बापू...त्यांचीं प्रतिबिंबं पाहून...मी आपल्या आत्म्याचं समाधान करीत असे !—म्हणूनच मधुमालतीचीं फुलं...मला इतकीं आवडत असत...म्हणूनच मधुमालतीच्या फुलांची मी इतकी शोकी होतें...! उगाच नाहीं...! मधुमालतीचीं फुलं...मी नेहमीं जवळ बाळगीत असे...त्याचं हेंच कारण !...बापू..., माझ्या आत्म्याचं समाधान...जर कोणी केलं असेल...तर तें ह्या मधुमाल-तीच्याच फुलांनीं !...मधुमालतीचीं फुलं !...बापू......"

असं म्हणून कमळनें मजकडे एकदा नीट डोळे भरून पाहिलं; लगेच मान फिरविली; जरा अगदीं स्तब्धच राहिली, क्षणार्धांत तोंड हंसरं केलं !...आणि...........

झालं !...कमळचं ध्येय...संपलं...कमळचं जीवित संपलं,...कमळ गेली !...कमळ—

पण आज मला कशावरून आठवण झाली ?–कमळची आज आठवण व्हायला कारण काय !–हीं फुलं !–हीं मधुमालतीचीं फुलं ! !—

ले:— * *

# १२ फेब्रुवारी १९२५

[ या दुष्ट दिवशीं विद्यार्थिनी–वसतिगृहांत एक दुःखद निधनप्रसंग घडून आला. ]

जेथें पक्ष्यांपरि अम्हि सुखें कूजनीं दंग झालों,
जेथें वल्लींपरि कवळुनी एकमेकांस धालों,
जेथें गेलें वरुष सखये हांसुनी खेळुनीयां,
कैसें बाळे, निघसि वसति-स्थान तें टाकुनीयां ? ॥ १ ॥

नाहीं भेटी कधिंहि पुढतीं, बोलणें नाहिं बाई !
दृष्टोदृष्ट क्षणहि न अतां ! कोण संदेश नेई ?
हा ! हा ! दावी कुणि ग असलें तूज अज्ञेय स्थान ?
मैत्रीचा का झटकन असा बंध जावा तुटून ! ॥ २ ॥

ऐकूं दे त्या मृदुल तुझिया गोड वाणीस आतां !
कैशी प्रेमें वदसि नच तूं एकही शब्द जातां ?
तेजस्वी त्या उघडुनि जरा स्निग्ध नेत्रां पहा ना !
वा तें सौम्य स्मित तरी अम्हां दाविं गे मैत्रिणींना !

पूर्वींची त्वद्वदनिं अजुनी स्निग्धता; सौम्यता ती
शोभे, कां ही मग अशि गडे, निष्ठुरा मौनवृत्ती ?
चंद्रा, दावीं लव सदयता, बोल ग बोल आतां !
ऐकूं दे ना, तव वच सये, शेवटीं एक जातां !

* * * *

कविः—"वि. स. सुखठणकर"

फर्ग्युसन कॉलेज, पुणें.

# 'मित्रांच्या मैत्रिणी-!-'

सहवासानं म्हणे प्रेम वाढतं! खरंच-! म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं!-मग असं कां? आमचा म्हणजे कांहीं दिवसांचा सहवास नाहीं कीं कांहीं महिन्यांचा नाहीं!-चांगलीं वर्षांनुवर्ष एकत्र असतों! पण—मग असं कां?—

एखाद्या वेळीं सहज आपलं वाटतं,-हें असं कां असावं?-वर्षांनुवर्ष आम्ही एकाच संस्थेंत शिकत असतां,—आतां तर मला त्याचं फारच आश्चर्य वाटतं—एकमेकांचं भाषण असं कध्धीं नाहीं!-एका शब्दानं तरी कधीं—?...अं-हं—! अगदीं राम शिव गोविंदा! एखादे वेळीं कधीं अडी अडचणीस्तव—तें पण कधीं?—आतां अगदीं अडलंच कीं—कुठं एकाद दुसरा शब्द उच्चारला तर...लागलीच-"कां बरं? ती त्याच्याजवळ......हं!—कांहीं तरी आहे!..." झालं!-शंका-कुशंकांना सुरवात ठरलेली!! तर्ककुतर्क होऊन निकाल!!!-ह्यामुळं होतं कसं?--तें बोलणं नको अन् तें ऐकायला नको कुजकं!-थोडासा त्रास भोगायचा पतकरला; पण संशयाला कारण नको!-हो...नाहींतर उगीच........

एकाच कॉलेजांत, एकाच क्लासांत आणि वर्षांनुवर्षांचा संबंध! त्यांतून ती व्यक्ति म्हणजे माझ्या जवळपासच कुठंतरी बसलेली असायची. पण...पण आमचं कधीं एका शब्दानं दिखील बोलणं झालं नाहीं! मनांत आपलं कधीं कधीं वाटे कीं, आपण अगदींच मुकस्तंभासारखं काय बसायचं? आपले बोलावे दोन शब्द वेळीं प्रसंगीं...पण तें सर्व मनांतच! जनांत काय? लोक आपल्याला काय म्हणतील या भितीनें सर्व मुक्यांचा बाजार! आणि (कुठं) कांहीं प्रत्यक्ष संबंध यायची वेळ आली कीं मुळीं आधींपासूनच टाळाटाळीला सुरवात!-आणि ती साधण्यासाठीं ओळख असून बिन ओळखी बनायचं!-काय चमत्कार आहे!

त्या दिवशीं काय झालं—संध्याकाळीं अशी करकरीत तिन्हीसांजची वेळ. मी आपली सहज मागच्या अंगणांत मधुमालती शेजारीं खुर्ची टाकून झूल कीं कायसं करीत बसलें होतें. कुसूम कायशी पेटी वाजवीत होती. होय...तिचं तें "किति आनंद फुलवि कलिकाऽऽ-" चाललं होतं वाटतं...संध्याकाळच्या गारशा वेळीं कारंजा उडत होता. मधुमालतीजवळ बसावंसं वाटलं म्हणून बसलें आपली सहज. कुसुमच्या गाण्यानं तर माझं मन फारच रमलं. इतक्यांत कसलासा धाडकन् एकदम कोणीतरी पडतं असा आवाज आला ऐकायला! तशीच मी इकडे तिकडे पाहूं लागलें. पाहातें तों, माझ्या शेजारीं बसणारी ती व्यक्ति!—वळणावर सायकल वळवितांना कांहींतरी दगडबिगड आडवा आला असेल...ती व्यक्ति खालीं जमिनीवर पडलेली! सायकल एकीकडे, पुस्तकं एकीकडे आणि आपण एकीकडे! तें पाहून माझं हृदय अगदीं वर खालीं होऊं लागलं. वाटलं नुसतं जावं आणि तेवढीं पुस्तकं तरी गोळा करून द्यावींत...पण छे! लोक काय म्हणतील?-मनांत कोण भीति! माझ्या छातींत तर केवढा गोळा उभा राहिला!-त्यांतून ती व्यक्ति जर अगदींच परकी असती, तर माझ्याच्यानं कंपाउंडापर्यंत तरी जाववलं असतं. पण—इथं तो परिचय आडवा आला. इथं तो सहवास मध्यें पडला. नाहींतर..........मनानं किती उचल घेतली तरी पाय कुठं हलताहेत जागचे! मी अगदीं मुकस्तंभासारखा त्या व्यक्तीकडे लांबूनच पाहात उभी राहिलें. रक्तबिक्त देखील आलं असेल... अगाऽऽई!-पण काय उपयोग? माझ्या सहवासाचा त्याला काय उपयोग झाला? थोडया वेळानं तो बिचारा हळु हळु सर्व सांवरून चालूं लागला. तेव्हां म्हटलं, आतां आपण तोंड फिरवावं. नाहींतर त्याला बिचाऱ्याला वाटायचं—ही माझी गम्मत पाहाण्यासाठीं—मला खिजविण्यासाठींच मजकडे पाहात उभी आहे—न जाणों!

माझा त्या बिचाऱ्याला कांहीं उपयोग झाला नाहीं. एकाच कॉलेजांत, एकाच क्लासांत, आणि वर्षानुवर्षांचा संबंध!-त्यांतून व्यक्ति माझ्या नेहमीच्या ऐकण्यांतली-पाहाण्यांतली!-पण-! फुकट माझा

जीव मात्र हळहळला व विचार करतां करतां, साऱ्या रात्रभर कांहीं माझा डोळ्याला डोळा असा लागला नाहीं.

सहवासानं म्हणे प्रेम वाढतं ! होय, पण तें व्यक्त करून दाखविण्याची मात्र चोरी ! पण ह्यांत प्रेम कसलं आलं आहे ? साधं कर्तव्य !– पण तिथं तो सहवास आडवा आला. ती व्यक्ति जर माझ्या क्लासांतली नसती व इतक्या पाहाण्यांतली नसती, आणि आम्ही एका कॉलेजांत नसतों तर... तर मी नक्की त्या व्यक्तीजवळ जाऊन—पुरुष कां असेना– अगदीं नीट पाहिलं असतं व माझ्याच्यानं जी कांहीं शक्य तेवढी मदत मी केली असती. पुस्तकं तरी गोळा करून दिलीं असतीं खास. पण......

कॉलेजांतील सहवासानं प्रेम वाढतं कीं नाहीं कुणास ठाऊक... पण लोक काय म्हणतील–या भीतीनं, मानवी कर्तव्यें बजावण्यांत मात्र अशा प्रकारं आडकाठी येते. थोडक्या प्रयासानं दुसऱ्याचा जरी मोठा फायदा होत असला, तरी आपण टाळाटाळी करतों !...छे...मनावर संस्कारच चमत्कारिक घडलेले ! पाऊल उचलतच नाहीं पुढं—

असं कां असावं ?

लेः— ....................

---

विनोदी तशाच अत्यंत चटकदार
आणि
हृदयंगम गोष्टींचा संग्रह
"कॉलेजांतील गोष्टी"
तरुणांनो,
१५ मेच्या सुमारास आपल्या आवडत्या बुकसेलरकडे तपास करा.

# वंचना.

भोळा जीव मदीय हा भुलविला, बाळे, तदां तूंच ना,
सौख्याची नव्हती मनीं मम यदा अंधूकही कल्पना,
दृष्टिक्षेपहि गोड टाकुनि किती केलीस जोपासना
प्रेमाची, स्मित नित्य मोहवि तुझें या भाग्यशाली मना.

केव्हां गालिं खळी, कधीं वच तसें उत्साहदायी अती,
तैसा तो सहवास जेथ उसळे उन्मादकारी मती!
प्रेमाचीं वचनें दिलीस हंसुनी कां सांग अप्रार्थित?
सौख्याचा नव स्वर्ग तेथ गमला—झाला तदा अंकित!

[illegible] दिन, संपली सुरुचिरा श्रीशारदोपासना,
हातीं ये पदवी, करी मन तुझी सप्रेम आराधना,
अन्याला कर देउनी मज असें कां वंचिलें? चंचले,
संसारीं मधुवृत्ति दुःखकर! जा, नातें तुझें संपलें.

चित्ताचें सुम वाहिलें प्रथम हें सोत्कंठ, बाले, तुला!
आतां देउं कुणां पुन्हां सुमन हें? निर्माल्य झालें मला!

कविः—“ मनोहर ” बी. ए. एल्. टी.

डेक्कन कॉलेज, पुणें.

# हुंगलेलें फूल !

(दिंडी)

सहज गेलों उपवनीं फिरायाला,
व्यग्र चित्ता लव स्वास्थ्य द्यावयाला;
दूर करण्या संसार यातनांना,
विस्मराया उद्विग्न भावनांना ॥ १ ॥

तिथें मोठाले ताटवे फुलांचे
रम्य फुलले मम स्वागतार्थ साचे;
दृश्य पाहुनि तें नयन मनोहारी
मोद झाला मम मानसास भारी ॥ २ ॥

कुंज कुंदांचा फुलुनि पुरा गेला,
भार झाला जुइ लतामंडपाला;
आणि बकुळीला बहर कसा आला,
काय रसिकां ! मी सांगुं हो तुम्हांला ! ॥ ३ ॥

सुभग सौगंधिक मंद मंद वात,
तप्त हृदया सानंद करी शांत;
विरुनि गेलें काहूर विचारांचें,
सहजिं पसरे साम्राज्य शांततेचें ! ॥ ४ ॥

सुमन संभारें नटुनि बागशाही,
ईशकृतिची देतेच काय ग्वाही;
क्षणिक झाला भ्रम असा मन्मनास
करित कौतुक मी आक्रमीं पथास ॥ ५ ॥

गर्द हिरवी सुमलता एक छान,
पुढें जातां वाटेंत ये दिसून;
प्रसुन एकच उत्फुल्ल जाहलेलें,
लतावल्लयीं स्वच्छंद खेळ खेळे ! ॥ ६ ॥

पुष्प हंसरें तें रुचिर गेंददार,
बघुनि झाला आनंद मना फार;
' खुडुनि घेऊं या त्यास हुंगण्यास,'
हीच चित्तीं वावरे गोड आस ! ॥ ७ ॥

हृदय वेडें हळवार, कुठुनि त्याला
पुष्प खुडण्याचा धीर व्हावयाला !
हात पुढतीं लव जाइना मुळींच
' पुष्पछेदन '—छे ! कल्पनाच नीच ! ॥ ८ ॥

आणि म्हणुनी नच दुखवितां फुलाला,
हळुंच वेलीवरि हुंगिलें तयाला;
गंध सेउनि संतोष मना झाला,
धन्य माझ्या मानिलें जीविताला ! ॥ ९ ॥

सुमन दर्शन घेऊनि एक वार,
मार्ग क्रमण्या मी होतसें तयार;
तोंच मोठें आश्चर्य ये घडोनी
घुमे कुसुमांतुनि ईषदेक वाणी !—॥ १० ॥

" हाय ! केलें हें काय निर्दया रे !
देह माझा भ्रष्टिला तूं कसा रे !
नीच अगदीं ही जात मानवाची,
चाड कुठुनी त्या सुमन शुद्धतेची ? ॥ ११ ॥

आणि करुनी पावित्र्यभंग आतां,
त्यजुनि जाणें मज शोभतें तुला का ?
देह माझा त्वत्पदीं जाण लीन,
कोण त्राता मज अन्य तुझ्यावीण ? ॥ १२ ॥

बोल वदुनी हे थकुनि फूल गेलें,
दीनवाणें बापुडें स्तब्ध ठेलें !
पुढतिं कंपित कर करुनि मी तयास
जपुनि लागे खुडण्यास सावकाश ! ॥ १३ ॥

अहा जलबिंदू दोन तों गळाले,
आणि माझ्या नयनांत अश्रु आले !
मधुर सुम तें चुंबुनी गौरवीलें,
हृदयभागीं मृदुकरें ठेवियेलें ! ॥ १४ ॥

*     *     *     *

नाहिं पुनरपि तें हांसलें कधींच,
छे ! न फुललें या पुढें तें मुळींच !
जतन केलें जरि जिवापाड त्यास
पुष्प कायमचें राहिलें उदास ! ! ॥ १५ ॥

कवि:—" त्र्यंबकानुज "

न्यू पूना कॉलेज, पुणें.

# फोल आयुष्य !

कुसूम:—

यमुना वहिनी, आज चला गडे खेळायला. रोज आम्हांला गाणीं शिकविण्याच्या आधीं खेळायला येईन म्हणून म्हणतां आणि येत मात्र नाहीं. मुलींना असं फसविणं कांहीं चांगलं नाहीं. आज मुली तुमच्यासाठीं अगदीं खोळंबून बसल्या आहेत. त्यांनीं आज हट्टच घेतला आहे कीं तुम्ही आल्याखेरीज कांहीं खेळाला आरंभच करायचा नाहीं. चला–अहो मनाला काय ?—जितकी उदासी आणावी तितकी ती जास्तच वाढणार !

यमुना:—

कुसूम, अशी उदासी आणून का येत असते ? तुम्ही इतक्या प्रेमानं मला बोलावतां !–तुमच्याशीं खेळूं नाहींसं का मला वाटतं ? पण मी तरी काय करूं ? कुसकरलेल्या फुलाइतकं माझं मन दुर्दैवानं नीरस करून टाकलं आहे. मला आतां कशांतच गोडी वाटत नाहीं. कुसूम, या जगांत मला आतां खेळ खेळायला योग्य अशी वस्तु तरी कुठं आहे ? मनाच्या हौसेकरितां-मनाच्या समाधानीकरितां ज्यांच्याशीं खेळ खेळायचा ती वस्तु सर्व त्रिभुवनांत शोधली तरी आतां का ती सांपडणार आहे ? मी आतां कुणाशीं खेळूं ? काय ग कुसूम, देवाची भंगलेली मूर्ति कुशल कारागीर पुन्हा सांधतो; एक फूल कोमजलं दुसरं निर्माण होतं; आजची सकाळ गेली उद्याची आनंदाची सकाळ पुन्हां उजाडते. दुर्दैवी मातेचा पांग मूल पोटीं येऊन फेडतं. या जगांतील प्रत्येक वस्तला

पुनर्जन्म आहे म्हणतात. मग माझी हरवलेली वस्तु, माझं कोमेजून गेलेलं शरीर, माझा नाहींसा झालेला प्राण, पुनर्जन्माच्या रूपानं तरी देवा, माझ्या पोटीं घालून मला सुखी केलं असतंस, तर माझ्या भाग्याला सीमा उरली नसती. देवा, माझ्या मागील जन्मीच्या कांहीं पापकर्मांचा जर तुला सूड घ्यायचा होता तर मला बालविधवा करण्यापेक्षां अल्पायुषी कां नाहीं केलंस ? बालविधवेला स्वर्गाचं द्वार खुलं नाहीं; बालविधवेला मोक्ष नाहीं; बालविधवेला जगांत, समाजांत, कुटुंबांत मान नाहीं ! देवा, हा पापी जन्म,—हें फोल आयुष्य !—मी आतां कुणाच्या जिवावर काढूं ?

ले:————

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३७७२

# " ऐकूं दे तव गान-निर्झरा ! "

ऐकूं दे तव गान-निर्झरा, ऐकूं दे तव गान ॥ ध्रु० ॥

उडि घेतांना खडकावरुनी,
वळसे घेतां हिरवळींतुनी,
शरद् ऋतूंतिल चांदण्यांतुनी,—
भीषण अंधारांतुनि गातां, झुळझुळ मंजुळ गान ॥ १ ॥

वेड लागलें कितिका ऐकुनि,
अतृप्तचि गेले किति मरुनी,
मीहि ऐकितों वेड्यावाणी,—
तृप्त न होई नित्य ऐकितों जरि तव मंजुळ गान ॥ २ ॥

पुराण कालीं सतत गायिलें,
कलो युगीं परि तेंच गाइलें,
नाविन्य न मुळिं त्यांत दाविलें;
आजहि गासी तेंच आपुलें झुळझुळ मंजुळ गान ॥ ३ ॥

गान ऐकितां मोहुनि गेले,
थोर कवी तव मन नच विटलें,
गाणें गातां युगहि लोटलें;
काय माधुरी त्यांत सांठली, कळुं दे मज तव गान ॥ ४ ॥

स्वर्गीचें का गाणें गातो,
छंद न ज्याचा तुजला सुटतो,
काय माधुरी त्यांत पाहतो—
मलाहि कळुं दे कांहिं त्यांतली; गा तूं अपुलें गान ॥ ५ ॥

लतावेलिंना रिझवायाला,
प्रेमपाशिं या गुंजविण्याला,
हृदयस्वामिनि असेल तिजला,—
प्रेमगीत कीं गातो संतत—झुळ झुळ मंजुळ गान ॥ ६ ॥

कर्मयोग जो श्रीकृष्णानें,
अर्जुनासि कथिला प्रेमानें,
त्वां ऐकियला अपुल्या श्रवणें,—
नित्य मनाशीं जो गुणगुणतो, तेंच काय हें गान ? ॥ ७ ॥

स्वातंत्र्यांतच जन्म जाहला,
स्वातंत्र्यांतच सदा वाढला,
स्वातंत्र्यांतच तन्मय झाला,—
स्वातंत्र्याचें गीत तवमुखीं असेल झुळझुळ गान ॥ ८ ॥

स्वातंत्र्याहुनि प्रियतर जगिंया,
कवण वस्तु कवणाला सखया ?
परी जन्मलों पारतंत्र्य या,
कोठुनि कळणें मग मज माधुरि, गा तूं अपुलें गान ! ॥९॥

कवि:—" राम "

होळकर कॉलेज, इंदोर

# समाजाचें हृदयाविष्करण

" अज्ञातवास, बंदिवास,...यापेक्षांही एखादा भयंकर कारागृहवास पतकरला; पण ह्या सुधारणेचा सहवास नको. 'सुधारणा !'–शब्द किती मोहक !——

एखादा खेडेगांवांतील गांवढळ माणूस जेव्हां मुंबई शहर पाहाण्यासाठीं मोठ्या हौसेनं जातो आणि तेथें गेल्यावर तें अफाट बोरीबंदर स्टेशन,—तेथील विजेच्या दिव्यांचा लखलखाट,—विद्युद्वेगानं धांवणाऱ्या ट्रामगाड्या,—भव्य इमारती—निरनिराळे लोक—त्यांची ती इष्कीची वागणूक––एवढ्या मोठ्या गोष्टीपासून तों गिरण्यांतील चिमण्यांतून वर आकाशांत जाणारा धूर !—मजुरांचीं काळीं तोंडं !–हॉटेलांतील घाणेरडा सिंगल !—असल्या यःकश्चित बाबींत देखील त्याला कौतुक वाटतं ! त्याची अक्कल तें सर्व पाहून गुंग होते व गुंग झालेली अक्कल झिंगलेल्या दारुड्याप्रमाणें विचारहीन होऊन इतकी बेताल होते कीं, दिवाळखोर व्यापाऱ्यासारखं त्याच्या अकलेचं भांडवल संपुष्टांत येतं. शेवटीं त्याची इतकी फट्-फजिती उडते कीं, तो गांवीं गेल्यावर त्याच्या अकलेची घरोघर नक्कल होऊन बसते ! समाजा, सुधारणेच्या ह्या बाह्य भपक्याला भुलून, वेडावून जाऊन तूं देखील आपल्या अकलेची सर्व जगाला आज नक्कल करून दाखवीत आहेस. बा समाजा, तूं आपली पूर्वपीठिका आठव आणि सांप्रतचं हीन चित्र आपल्या डोळ्यापुढें ठेव. केवढं हें जमीन अस्मानाच अंतर !–तुझा पूर्व भाग किती उज्ज्वल आणि हल्लींची स्थिति किती शोचनीय !—

शुभ्र आकाशांत नक्षत्रांनीं चमकावं आणि कांहीं वेळानं भूतलावर त्यांचं पतन गारगोटीच्या स्वरूपांत व्हावं !–गिरिकंदरीं स्वतंत्रतेच्या साम्राज्यांत राहून ज्या वनराजानं डौलांत वावरावं !–आसपासचा प्रदेश

एका गर्जनेनं हादरून टाकावा !–सभोंवतालीं दृष्टि फेकल्यावर अखिल चराचर भयभीत व्हावं !–तो वनराज प्रोफेसर छत्र्यासारख्यांच्या ताव-डींत सांपडावा !–गरीब विचारा बापडा होऊन त्यानें वटारलेल्या डोळ्यांपुढें यानं आपलं विशाल मस्तक नमवावं !–चाबकाच्या क्षुल्लक आवाजाला भिऊन त्याच्या अंगाचा थरकांप व्हावा !–शेळ्यामेंढ्यांनीं त्याच्यावर कुरघुडी करावी !–शेंबड्या पोरांनीं त्याला खडे मारावेत !—

समाजा, अशी तुझी दीन स्थिति व्हावी ! जो समाज सर्व जगाला आदर्शभूत !––ज्यानं आपल्या अकलेचं राज्य दुसऱ्यावर चालवावं–त्या समाजानं आज ह्या सुधारणेच्या बुटाच्या लाथा खाव्यात!––तिच्या मायावी कवटाळण्याला भुलून तिच्या बुटावर, तिच्या पोकळ पोलक्या-वर तिच्या नखरेबाज दृष्टीवर, तिच्या बसण्याउठण्यावर काव्यें रचून तूं आपल्या ज्ञानाची माती करावीस !––सुधारणेनं तुला आपला गुलाम करून तुझ्याकडून सक्तीनं कामं करून घ्यावींत !—तिच्या शालीच्या घड्या तूं घालाव्यास !–तिच्यावर छत्री धरून चपराशासारखा तिचा तूं हमाल व्हावास–चहाचा कप घेऊन आर्जवी चेहऱ्यानं तिच्यापुढं तूं तिष्ठत उभं राहावंस!–समाजा,—ही तुझी अंतस्थ अपमानास्पद स्थिति कुणाला तरी खरी वाटेल का !—

जगाचा याच्यावर विश्वास बसणार नाहीं !––पण माझं हें हृदया-विष्करण––भडक रंगानं रंगलं गेलेलं एखाद्या चिताऱ्याचं बनावट चित्र नव्हे !–काव्यस्फूर्तींतील हा एक कल्पनामय प्रसंग नव्हे !–जगाला हंसविण्याकरितां–जगाची दिशाभूल करण्याकरतां अतिरेकाच्या भरांत विनोदानं लिहिलेला हा एक नाटकांतील प्रवेश नव्हे !–पश्चात्तापानं तळ-मळणाऱ्या आत्म्याचं हें एक हृदयाविष्करण आहे !–फटके मार–मारून वठणीस आणलेल्या चोराच्या कबुलीजबाबासारखी—बहकलेल्या-—वेडावलेल्या पण आज शुद्धीवर आलेल्या समाजाची—ही एक साधी, सरळ आणि सत्य–जबानी आहे !

वेड्या समाजा, अजून तरी शुद्धीवर ये !—"

## " विद्यार्जनासाठीं परदेशीं जाणाऱ्या एका सहाध्यायाला ---उद्देशून--- "

[ चालः—" आनंद कंद ऐसा " ]

गेले महातपस्वी, ऋषिवर्य आद्य गेले।
गेलें सदा सुखाचें, प्रभु रामराज्य गेलें ॥ १ ॥

बोलोनि दिव्य बोला, श्रीकृष्ण व्यास गेले।
स्वातंत्र्य-वीर शिवबा, बाजी प्रताप गेले ॥ २ ॥

गेले महामतीचे, गेले महा धिराचे।
सौवर्णभूमि वचनीं, हें नाम मात्र उरलें ॥ ३ ॥

कलिकाल चक्र फिरलें, परतंत्र देश झाला।
जेत्यांस राष्ट्र भुललें, वाली कुणी न उरला ॥ ४ ॥

स्वातंत्र्य सूर्य लपला, नलिनी पहा निमाली।
अज्ञान तम पसरला, आशा उषा पळाली ॥ ५ ॥

उद्दाम काल ओघीं, ही हाय ! नाव फुटली।
बालासहीत फसली, असहाय माय पंकीं ॥ ६ ॥

पोटास अन्न नाहीं, प्राणास फांस बसला।
अंगास वस्त्र नाहीं, उघडाच देह पडला ॥ ७ ॥

विपिनीं मनोविहारी, सिंहीण पंजरस्था।
कलभा बघोनि काढी, मृत जीवनास आतां ॥ ८ ॥

कितीहि दीन दिसली, कितीहि हीन असली ।
व्यसनीं कितीहि रुतली, तरी मायभूमि अपुली ॥ ९ ॥

कुलकालिमा निपजला, अव्हेरिला जनांनीं
पदरें अशा सुतातें, जगिं झांकि एक जननी ॥ १० ॥

पक्षांस पंख येतां, नाना विहार सुचती ।
निज कोटरा विसरती, पितरांस दुःख देती ॥ ११ ॥

विद्यार्जनास जातां, संपन्न अन्य देशा ।
निजधाम आठवावें, मनिं पूर्ण सांठवावें ॥ १२ ॥

परराज्य तंत्र बघतां, मनु याज्ञवल्क्य यावा ।
स्मरणीं, नगास बघतां, नगराज आठवावा ॥ १३ ॥

दृष्टीस येत सरिता, तों जान्हवी स्मरावी ।
सरतीर मार्गीं पडतां, मति मानसीं रमावी ॥ १४ ॥

लीला निसर्ग—रतिच्या, पाहोनि चित्त हारी ।
वाटो अशीच नाचे, अति स्वैर भारतीं ही ॥ १५ ॥

नरवीर दिव्य बघतां, टागोर कालिदासा ।
ठसवा सदा स्वचित्तीं, जगदीश कर्मदासा ॥ १६ ॥

ऐश्वर्य पूर्ण नगरीं, प्रासाद भव्य दिसतां ।
नरनारि संघ तिथला, आनंद मग्न असतां ॥ १७ ॥

तीं दीनमुख दिसावीं, कृश अर्भकेंच इथलीं ।
दास्यांत वाढलेलीं, धनहीन त्रस्त झालीं ॥ १८ ॥

नव युवति हास्य नादें, कल श्रोत्रयुग्म भरतां ।
उन्मुक्त त्या विलासें; चित्तास मोह पडतां ॥ १९ ॥

लज्जावती स्मरावी, स्मितहासि आर्यबाला ।
ती धीर वीर माता, पति एक देव तिजला ॥ २० ॥

ऐशापरी जिवींच्या, स्वत्वास जागवावें ।
स्वत्वीं सदा रहावें, सुखि भारता करावें ॥ २१ ॥

शंका कधीं न येवो, उद्धार भारताचा ।
होणें न वा, धरावा, दृढ भाव निश्चयाचा ॥ २२ ॥

सूर्यास्त होत, फिरुनी, का अरुण येत नाहीं ? ।
लघुचंद्र पाडवेचा, कां पूर्ण होत नाहीं ? ॥ २३ ॥

निद्रिस्त केसरीतें, कां जाग येत नाहीं ? ।
कधि शांत सागराचा, कां भंग होत नाहीं ॥ २४ ॥

पडतां फिरुनि चढणें, क्रम हा खरा जगाचा ।
होणार खास समजा, उद्धार भारताचा ॥ २५ ॥

कविः—" कृष्णाकुमार " बी. ए.

लॅा कॅालेज, नागपूर.



# "निवड होउं दे....!"

[ रागः—सोहोनी—दादरा ]

फुलला फुल-बाग गड्या,
निवड होउं दे...॥ ध्रु० ॥

जाईजुइ....कुंज खुलत,
विविध फुलें रम्य फुलत,
फुलत !-खुलत ! !-बघ विलसत ! ! !—
निवड होउं दे......॥ १ ॥

* * *

स्वातंत्र्याविण असतां,
कोण असे जगिं त्राता ?
स्वातंत्र्यें अटप अतां—
निवड होउं दे......॥ २ ॥

* * *

हृदयीचा मित्र एक !—
असतिल जरि किति अनेक,
हृदयींचें पुष्प एक !—
निवड होउं दे......॥ ३ ॥

× × ×

फुलला फुलबाग गडे,
निवड होउं दे—
निवड होउं दे—

* × *

# "कॉलेजांतील गाणीं!-"

आमच्याकडे स्त्रिया आणि गाणीं ह्या दोन कल्पना एकमेकीशीं इतक्या सल्लग्न होऊन बसल्या आहेत कीं कांहीं विचारूं नका. गाणीं म्हटलीं म्हणजे तीं कांहींतरी स्त्रियांनींच म्हणावयाचीं व स्त्रियांचींच असलीं पाहिजेत असें साधारणतः समजलें जातें. पण वस्तुस्थिति अशी आहे का ? पुरुष कधीं गाणीं म्हणतच नाहींत का ? गाणीं म्हटलीं म्हणजे तीं नेहमींच बायकांच्यासाठीं व बायकांचींच असतात का ?

ह्या प्रश्नांचीं उत्तरें देणें विशेष कठीण आहे असें नाहीं. कॉलेजांतील वसति-गृहांमधून पाहा, मुंबईंतील चाळींतून ऐका, किंवा पुण्यांतील वाड्यांना कान द्या..............................

कुठें

—" संशय कांऽमनिं आऽला—"

तर कुठें

—" लाऽवि चटक गुण गाऽना—"

कुठें

—" बाऽज साजिराऽऽ—हमिराऽ—"

तर कुठें

" जिऽकोनि अबलाऽ—

जिंकोऽनि अबला—"

अशा प्रकारचा ध्वनि–कधीं ताना तर कधीं लकेऱ्यांच्या रूपानें तुम्हांला ऐकूं येईल. आणि जास्त बारकाईनें निरीक्षण केलेंत तर, म्हणणाऱ्या बहुतेक व्यक्ति स्त्रिया नसून पुरुषच आहेत ह्याबद्दल तुमची पक्की खातरी होईल. मग गाणीं म्हटलीं म्हणजे तीं स्त्रियांनींच म्हणावयाचीं

असें कसें म्हणतां येईल ? वर सांगितलेलीं " संशय का मनिं आला "— वगैरे गाणीं नाहींत का ? तुम्ही कदाचित् त्यांना " पदें " म्हणाल. पण मला तर 'गाणें' आणि 'पद' यांत विशेष कांहींच फरक दिसत नाहीं. गाणीं म्हणा, नाहीं तर पदें म्हणा, पुरुषही म्हणतात. बायकाच म्हणतात असें नाहीं. त्याचप्रमाणें गाणीं म्हटलीं म्हणजे तीं नेहमीं स्त्रियांचींच असतात हेंही म्हणणें तितकेंच फोल आहे. पुरुषांचीं गाणीं नसतात असें नाहीं. " दे हाता या शरणांगता "—" वेध तुझा लागे सतत मनीं—" हीं व अशाच प्रकारचीं कित्येक, पुरुषांचींही गाणीं दाखवितां येतील.

तेव्हां "गाणीं" हीं नेहमीं बायकांनींच म्हणावयाचीं व बायकांचींच असें नसून, त्यावर स्त्री–पुरुषांचा समान हक्क आहे–असें म्हणण्यास कोणतीही हरकत नाहीं.

आतां ह्या पुस्तकाला " कॉलेजांतील गाणीं " हें नांव कां दिलें तें पाहूं.

" कॉलेजांतील गाणीं " नांवा ऐवजीं " कॉलेजांतील भाव–गीतें " असें म्हटलें असतें तर विशेष फरक झाला असता असें नाहीं. कारण ज्याप्रमाणें भाव–गीतांत ( lyric ) एकच भावना केंद्रित झालेली असते त्याप्रमाणेंच ह्या पुस्तकांतील प्रत्येक वेच्यामध्यें बहुधा एकच कल्पना केंद्रस्थ असलेली आढळून येईल. परंतु भावगीताला संगीताची अगर छंदाची अत्यंत आवश्यकता असते. किंबहुना त्याशिवाय भावगीत होणारच नाहीं. ह्या पुस्तकांतील वेंच्यांमध्यें छंदविरहित कांहीं गद्य लिखाणही आहे. आणि म्हणूनच ह्या पुस्तकाला " कॉलेजांतील भाव–गीतें " असें नांव दिलें नाहीं.

आतां 'गाणें' ह्याला संगीताची अगर छंदाची अवश्यकता नाहीं असें नाहीं. परंतु गाणें ह्या शब्दाचा गौण अर्थ घेतला म्हणजे एक भावनामय गद्य लिखाणालाही 'गाणें' म्हणतां येईल. एखाद्या माणसाला

गांवीं जावयाचें असलें कीं जाण्याची एकच भावना त्याच्या हृदयांत एक-सारखी खेळत राहिल्यामुळें तिचें प्रतिबिंब त्याच्या कृतींत आणि बोलण्यांत पदोपदीं दिसून येतें. तें पाहून आपण त्यास म्हणतों, " अरे, जायचें... जायचें...' असें गाणें काय लाविलें आहेस? जायचें तर जाशील..." येथें गाणें ह्या शब्दानें एक भावनामय गद्याचा बोध होतो. तेव्हां गाणें म्हटलें म्हणजे त्यांत संगीतयुक्त अगर छंदबद्ध, एक भावनामय पद्य; आणि छंदविरहित पण एक भावनामय गद्य; ह्या दोहोंचा अंतरभाव होतो.

ह्या पुस्तकांत वर निर्दिष्ट केलेल्या दोन्हींही प्रकारांचा समावेश केला गेला असल्यामुळें "कॉलेजांतील भाव-गीतें" ह्या नांवापेक्षां "कॉलेजांतील गाणीं !" हेंच नांव ह्या पुस्तकाला यथार्थ आहे.

एक भावनामय गद्याचा प्रकार मराठी भाषेंत अगदीं नवीन आहे. वाचकवर्गावर त्याचा परिणाम काय होईल हें अद्याप पाहावयाचें आहे.

लघुकथा ( short story ) आणि एक भावनामय गद्य यांमधील फरक एखादी आजकालची लघुकथा वाचून नंतर ह्या पुस्तकांतील "प्रेम कीं शिक्षण ?", " मधुमालतीचीं फुलें—", " मित्रांच्या मैत्रिणी " वगैरे वाचल्यानंतर वाचकांच्या सहजच लक्षांत येईल.

अशा प्रकारें कॉलेजांतील व्यक्तींनीं लिहिलेलीं भाव-गीतें व छंद-विरहित पण एक भावनामय गद्यें, म्हणजेच " कॉलेजांतील गाणीं ! "

ह्या पुस्तकाला " कॉलेजांतील गाणीं " हें नांव मुद्दाम देण्याचें कारण म्हणजे पहिल्यानेंच वर निर्दिष्ट केलेली आमच्यांतील एक विचित्र समजूत. 'गाणीं म्हटलीं म्हणजे तीं कांहीं तरी स्त्रियांनींच म्हणावयाचीं व स्त्रियांचींच !' ह्या समजुतींत सत्यता कितपत आहे हें आतां निराळें सांगावयास नकोच.

Achcha.

**Good night**

वि. ना. पांगारकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 3002

# हें काय करतां ?—

Subhadra
Advt. Agency
Poona city.

भलते सलते चष्मे लावून डोळे जास्त बिघडून घ्याल. आमचेकडे या. आम्हीं अगदीं मोफत डॉक्टरी तपासणी करून उत्तम टिकाऊ चष्मा देऊं. डॉक्टरानें दिलेल्या नंबरचे चष्में ग्यॅरंटी-सह पण अगदीं माफक दरानें मिळण्याचें प्रख्यात ठिकाण म्हणजे आमचेंच—

## पानसे आणि कंपनी

**लायब्ररीसमोर बुधवार पेठ पुणें शहर.**

अगर

**२५६ कसबा पेठ सोलापूर.**

**तसेंच**

आम्हीं निरनिराळ्या सरबतांच्या पावडरा व अर्क तयार केले आहेत.

उन्हाळ्याचे दिवस आले. प्रवासांत लेमन, गुलाब, राजबरी तुम्हांला कशी मिळणार ?

एक कप पाणी घ्या, व त्यांत चमचाभर आमची पावडर अगर अर्क टाका. वाटेल तेथें एका क्षणांत सुवासिक सरबत तयार !—

**नमुना फुकट !! किंमती स्वस्त—एका रुपयांत ४० कप !!!—एक वेळ अवश्य नमुना पाहा.**

## मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर

नकलेबद्दल ) **ब्राह्मी तेल** ( सावध रहावें

मानसिक श्रमांचीं कामें करणारे, विद्यार्थी, वकील, वैद्य, डॉक्टर, न्यायाधीश व गिरणीकामगार, त्याप्रमाणें जागरणाचीं कामें करणारे, नाटकी, सर्कसवाले, तारमास्तर, स्टेशनमास्तर वगैरे लोकांस हें तेल वापरण्यास अत्यंत उपयोगी आहे. बाटली किं. आकारानुसार अनुक्रमें १८२, ८१०, ८६.

## बाळ-बाळंतिणीकरितां औषधें

**बाळंतकाढा नं. १**–पहिल्या दहा दिवसांत घेण्याचा किं. ८१४

**बाळंतकाढा नं. २**–दहा दिवसांनंतर घेण्याचा. किं ८१४.

**बाळकडू**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य. किं. ८८

**कुमारिआसव**–मुलाकरितां. बा. किं. ८१२.

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १८१० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ८१४
दीड रत्तल २८४ टं. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे, ५०० वर औषधें तयार असतात. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलॉग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां 'रुग्णपत्रिका' हीं सात आण्याचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**ब्राह्मी तेलाचे व टिकाऊ तयार काढ्यांचे मूळ कल्पक व शोधक,**

**दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स**, आर्यौषधी कारखाना चेंबूर, जि. ठाणें

दुकान–दवाखाना, ठाकुरद्वार मुंबई नं. २.

अत्यंत स्वस्त एकच हॉटेल

# माधवाश्रम

भोजनाची व राहाण्याची

उत्कृष्ट सोय.

जागा मध्यवस्तींत हवाशीर असून ट्राम व रेलवे स्टेशन-नजीक

गिरगांव, मुंबई.

## तुम्हांला काय पाहिजे ?

Subhadra
Advt. Agency
Poona City

स्वातंत्र्य पाहिजे ना ?—तर स्वदेशाकडे लक्ष द्या. आणि स्वदेशीच कपडे वापरा. तेणेंकरून जन्मभूमीला स्वातंत्र्य आणि सुख प्राप्त होऊन तुम्हींही स्वतंत्र्य आणि सुखी व्हाल.

# महाराष्ट्र स्वदेशी स्टोअर्स

**—४६३ बुधवार पेठ पुणें शहर.—**

अति विश्वसनीय आणि परदेशी मालापासून अगदीं स्वतंत्र असलेलें असें हें एकच वस्त्रभांडार आहे.

येथें अस्सल देशी पण तऱ्हेतऱ्हेचा माल अगदीं किफायत भावानें मिळतो.

**बाहेरगांवच्या ऑर्डरी मोठ्या आस्थेनें व वेळेवर पुरविल्या जातात.**

**एकदां अवश्य अनुभव घेऊन पाहा.**

उत्तम शिलाई व मजबूत अस्तरचे चांगल्यांत चांगले व सर्व फॅशनचे तयार कपडे कोठें मिळतात ?

असे कपडे मिळण्याचें ठिकाण

--पुण्यांत एकच !--

## " धी स्पेशल रेडिमेड क्लॉथ डिपार्टमेंन्ट.

टांगा स्टँड समोर—तळमजला—

बुधवार चौक पुणें शहर.

## अरे ए—! असा भटकतोस कां ?

तुला स्वस्त आणि चांगलीं पुस्तकं पाहिजेत ना ? मग—

हें पहा !—असा बुधवार चौकांतून थेट जा. शनवार वाड्यासमोर—

## आर. एस्. राऊत बुक डेपो,

१४९ कसबा पेठ पुणें शहर.

तुला सांपडेल तेथें शाळा व कॉलेजला लागणारीं सर्व प्रकारचीं नवीं जुनीं पुस्तकें मिळतात. परगांवीं व्ही. पी. नें पाठविलीं जातात. आणि जुनीं खरेदी केलीं जातात—**जा असाच पाहूं.**

# पाटणकर यांचें

# टॉनिकसिरप

**स्त्रिया, पुरुष व मुलांनीं घ्यावेंच**

**कारण**

भूक सडकून लागून, अन्न पचून भरपूर शक्ति येते; शौचास साफ होतें. रक्ताची वृद्धि होऊन लालबुंद व्हाल. धातुस्थानांतील दोष जातात, स्त्रियांस क्षयासारखी भासणारी अशक्तता जाते. लहान मुलें गुटगुटीत होतात. विद्वान डॉक्टर, वैद्यानीं वापरून शिफारस केली आहे. बा. किं. रु. १. पो. ख. ८९, तीन बा. रु. ३. पो. ख. रु. १.

**दवाखान्यांत प्रकृती तपासून औषधें देऊं.**

**पाटणकर मायदेव कंपनी,**

दवाखाना गिरगांव, मुंबई. ४

# अरुण

**महाराष्ट्राचें अत्यंत आवडीचें सचित्र मासिक**

वा. वर्गणी २॥ रुपये. वर्ष ४ थे.

अरुण कार्यालय, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई २

# पाहिलात का ?

Subhadra
Advt. Agency
Poona City.

## ग. गो. गोखले आणि कंपनीचा

# फोटोग्राफिक आर्ट स्टुडिओ.

नसेल तर—दगडू हलवाई यांचे दत्तमंदिराचे

**माडीवर या व पहा.**

येथें तुम्हांस वेळेवर पण सुंदर फोटो काढून मिळतील. तसेंच फोटोचें सामानही मिळेल.

**दर माफक.**

एन्लार्जमेंटस, ऑईल कलर, वाटर कलर, फ्रेंच पेस्टल, सी. पी. आ. अगर ब्लॅक अँड व्हाइटचीं कामें सुंदर व माफक दरांत करून मिळण्याचें

**हेंच तें ठिकाण.**

हिमालयांतील गंगोत्री, जम्नोत्री, बद्रिनारायण वगैरे रमणीय क्षेत्रांच्या सुंदर पन्नास फोटोंचें अलबम

**फक्त दहा रुपयांस**

येथें विकत मिळेल.

पाटणकर यांचें

# टॉनिकसिरप

**स्त्रिया, पुरुष व मुलांनीं घ्यावेंच**

**कारण**

भूक सडकून लागून, अन्न पचून भरपूर शक्ति येतें; शौचास साफ होतें. रक्ताची वृद्धि होऊन लालबुंद व्हाल. धातुस्थानांतील दोष जातात, स्त्रियांस क्षयासारखीं भासणारी अशक्तता जाते. लहान मुलें गुटगुटीत होतात. विद्वान डॉक्टर, वैद्यानीं वापरुन शिफारस केली आहे. बा. किं. रु. १। पो. ख. ८९, तीन बा. रु. ३।. पो. ख. रु. १.

**दवाखान्यांत प्रकृती तपासून औषधें देऊं.**

**पाटणकर मायदेव कंपनी,**

दवाखाना गिरगांव, मुंबई. ४

# अरुण

**महाराष्ट्राचें अत्यंत आवडीचें सचित्र मासिक**

वा. वर्गणी २॥ रुपये. वर्ष ४ थे.

अरुण कार्यालय, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई २

# पाहिलात का ?

Subhadra
Advt. Agency
Poona City.

ग. गो. गोखले आणि कंपनीचा

# फोटोग्राफिक आर्ट स्टुडिओ.

नसेल तर—दगडू हलवाई यांचे दत्तमंदिराचे

**माडीवर या व पहा.**

येथें तुम्हांस वेळेवर पण सुंदर फोटो काढून मिळतील. तसेंच फोटोचें सामानही मिळेल.

**दर माफक.**

एन्लार्जमेंटस, ऑईल कलर, वाटर कलर, फ्रेंच पेस्टल, सी. पी. आ. अगर ब्लॅक अँड व्हाइटचीं कामें सुंदर व माफक दरांत करून मिळण्याचें

**हेंच तें ठिकाण.**

हिमालयांतील गंगोत्री, जम्नोत्री, बद्रिनारायण वगैरे रमणीय क्षेत्रांच्या सुंदर पन्नास फोटोंचें अलबम

**फक्त दहा रुपयांस**

येथें विकत मिळेल.

कॉलेजांतील विद्यार्थि-विद्यार्थिनी व सर्वसाधारण

तरुण स्त्री-पुरुषांनीं अवश्य वाचण्यासारखें

अगदीं नवीन पुस्तक

फुलबाग

# कॉलेजांतील गाणीं !

**संपादकः—वि. ना. पांगारकर, बी. ए.**

"We want the poetry of life"

—*Shelley*

ह्या पुस्तकांतः-पुणें-मुंबई-इंदोर-नागपूर वगैरे ठिकठिकाणच्या निरनिराळ्या कॉलेजांतील तरुण व्यक्तींचीं नितांतसुंदर आणि चटकदार गाणीं व हृदयस्पर्शी नाटयछटा संग्रहीत केल्या असून ' प्रेम कीं शिक्षण ? ' ' मित्रांच्या मैत्रिणी ! '–' मधुमालतीचीं फुलं ! ' अशा अत्यंत हृदयंगम व जिव्हाळ्याचे विशिष्ट प्रसंग दाखविणाऱ्या रमणीय गोष्टीही दिल्या आहेत.

शिवाय पुस्तकाचे आरंभीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. **के. एम. खाडये एम् ए.,** यांची मार्मिक प्रस्तावना जोडली आहे.

सुंदर छपाई, ग्लेज कागद, मनोरम बांधणी ! इतकें असूनही पुस्तकाची किंमत फक्त सहा आणे ठेविली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3602

REFBK-0003702
REFBK-0003702